# ॰ पद देवीचे ॰

आदिशक्तिचे क्वतुक मोठे भूत्या मज केले ॥ धृ ॥

पंचभूतांचा  देह पोत हा त्रिगुणगुणी वळला ।
चैतन्याची ज्योत लावुनी प्रज्वलित केला ।
चित्ततेलानें प्राणवायुनें त्याला स्थिर केले ॥ १ ॥

उदरपर्डी देउनि हाती ब्रम्हांडी फिरवी ।
लक्ष चौरयांशी घरची भिक्षा मागविली बरवी ।
ज्या ज्या घरीं म्या भिक्षा केली तें तें घर रूचले ॥२ ॥

सकामकर्मे कवडया यांची माळा मम कंठीं ।
कर्मफळाचा कुंकुममळवट माझा लल्लाटी ।
पीडा बाधा शकुन सांगुनी लोकां भुलविले ॥ ३ ॥

आदिशक्तीचा असा मी भूत्या नाम वासुदेव ।
मागुनि जोगवा सद्गुरूचरणी धरिला दृढभाव ।
आदिशक्ति ही मजला वळाली भूतेपण नेले ॥ ४॥

जय जगदंब । जय जगदंब । जय जगदंब । नमोस्तुते